“महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सेवा व सुविधाचा चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्याशाखे अंतर्गत

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठी सादर

करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

सोमनाथ मारूती कारंडे

मार्गदर्शक

डॉ. एन. आर. काटे

ग्रंथपाल,

श्रीमती सुशिलादेवी देशमुख महीला महाविद्यालय, लातुर

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

सप्टेंबर—२०२२

“महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सेवा व सुविधाचा चिकित्सक अभ्यास”

प्रस्तावना (Indtroduction)

महाविद्यालय स्वायत्त असणे म्हणजे एक प्रकारे ते महाविद्यालय चांगल्या गुणवत्तेचे आहे असा विचार करायला हरकत नाही, कारण कोणत्याही महाविद्यालयाला ती स्वायत्तता भेटत नाही जे महाविद्यालय स्वायत्तता आहेत त्यांना ती स्वायत्तता त्यांचे जूने रेकॉर्ड त्यांची गुणवत्ता बघून भेटते अर्थात अशा महाविद्यालयांना खुप मेहनत घेवून सगळयाच प्रकारात अव्वल राहावे लागते.

स्वायत्तता म्हणजे काय स्वायत्तता म्हणजे मर्यादित स्वांतत्र स्वयंनियत्रणाचा व स्वंयशासनाचा आधिकार लोकशाही व्यावस्थेमध्ये राजकीय व आर्थिक सामाजिक असांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात स्वायत्ततेची मागणी सातत्याने होत आहे. शिक्षण क्षेत्रातील स्वायत्तता ही तर विशेष महत्वाची आहे. सध्याचे युग हे संगणकाचे आहे तरी कोणत्याही क्षेत्रामध्ये संगणकांचा वापर अनिवार्य झाला आहे. माहिती घेण्यासाठी शिक्षण क्षेत्र, सहकार, अशा वेगवेगळया क्षेत्रामध्ये तंत्रज्ञाचा उपयोग मोठयाप्रमाणावर केला जातो. त्यामध्ये स्वायत्त महाविद्यालयामध्ये वाचकाना सेवासूविधा देण्यासाठी संगणकचा वापरही मोठया प्रमाणात झालेला आहे.

स्वायत्तता महाविद्यालयामध्ये संगणकाचा वापर करून ग्रंथालयाच्या अधुनिकीकरणामध्ये भर पडली आहे, त्याच बरोबर वेळेची आणि कमी जागेमध्ये माहितीचा साठा करणे सोयीस्कर झाले आहे. सदर विषयाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील स्वायत्त महाविद्यालयाच्या

ग्रंथालयामध्ये झालेल्या विकासाचे टप्पे अभ्यासून त्यातून निष्कर्ष काढण्याचा सदर संशोधनातून प्रयत्न राहणार आहे. त्याच बरोबर संगणक प्रणालीचा माध्यमातून वाचकांना सेवासूविधा देण्यासाठी, ग्रंथालयामध्ये उत्तरोत्तर कसा प्रयोग केले आहेत याचा अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

संशोधन विषयाची निवड:

संशोधन समस्या लक्ष्यात येण्यासाठी संशोधकाकडे शोधक दृष्टी असणे गरजेचे आहे संशोधन समस्या मा्त्र संशोधकाच्या आसपास असते. परंतु ती ओळखण्यासाठी तिची जाणीव होण्यासाठी संशोधन समस्या लक्ष्यात येण्यासाठी संशोधकाचे ज्ञानचक्षु सजग असले पाहीजे. त्यांनी दैनंदिन घटनेचे चिकित्सकतेने निरीक्षण केले पाहीजे. जसे पुढील प्रकारच्या बातम्या, चर्चा, यांच्या निरिक्षणातून संशोधन समस्येची जाणीव होवू शकते. संशोधकास संशोधन कार्यामुळे सन्मान प्रतिष्ठा प्राप्त होवू शकते.

संशोधनाचे शीर्षक:

“महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील सेवा व सुविधाचा चिकित्सक अभ्यास”

व्याख्या संज्ञा, संकल्पना

१. स्वायत्तता:

महाविद्यालय स्वायत्त असणे म्हणजे एक प्रकारे ते महाविद्यालय चांगल्या गुणवत्तेचे आहे असे मानले जाते. केंद्रशासन विद्यापीठ व अनुदान आयोग यांच्या उच्च शिक्षणाच्या धोरणांनुसार ज्या महाविद्यालयांचे 'नॅक' या संस्थेद्वारे मुल्यांकन झाले असल्यास व ज्या महाविद्यालयांना अ, अ+ व अ++ श्रेणी व दर्जा नॅककडून प्राप्त असल्यास अशी महाविद्यालये उच्च शिक्षण विभागाचे ना हरकत पत्र पाप्त करून विद्यापीठ अनुदान आयोगाकडे महाविद्यालयास स्वायत्त दर्जा मिळावा यासाठी प्रस्ताव सादर करू शकतात. ज्या महाविद्यालयांना नॅककडून अ+ व अ++ श्रेणी आहे. अशा महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून तज्ज्ञ समितीच्या भेटी शिवाय स्वायत्त दर्जा बहाल केला जातो, तर अ श्रेणी प्राप्त असलेल्या महाविद्यालयांना तज्ज्ञ समिती प्रत्यक्ष भेट देऊन विद्यापीठ अनुदान आयोगाकडे अहवाल सादर करून शिफारस करते. त्यानंतर अशा महाविद्यालयांना स्वायतत्ता बहाल करण्यात येते, अशा महाविद्यालयांना स्वायत्ता महाविद्यालये म्हटले जाते.

२.ग्रंथालय:

भारतात ग्रंथलयाची पायाभरणी करण्यास अनेक विचारवंताचा हातभार लागला आहे. डॉ. एस. आर. रंगनाथन व सयाजीराव गायकवाड यांच्या योगदानातून ग्रंथालयाचा प्रसार व प्रचार होऊन ग्रंथालये हे योग्य नावारूपाला आली. भारत देशात वेगवेळया घटक राज्यात व प्रादेशिक विभागांतर्गत जिल्हा स्तरावर व तालुका, ग्रामीण

भागात वेगवेगळया ग्रंथालयाच्या निर्मित्या झाल्या, प्रत्येक बुध्दिजीवी व्यक्तीच्या गरजा व सेवा ग्रंथालयात दडलेल्या आहेत. या सेवायुक्त गरजांची पूर्तता ग्रंथालय व्यवस्थितरीत्या पार पाडीत असते. समाजाच्या सर्व स्तरापर्यंत ज्ञानाचे संप्रेषण करण्याची जबाबदारी आज घडीला ग्रंथालयाची आहे.

विषयाचे महत्व:

संशोधनासाठी संशोधकाने निवडलेला विषय हा महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयातील ग्रंथालयांवर आहे. या स्वरूपाचे संशोधन झाले नसल्याने प्रस्तुत संशोधनाची गरज आहे. प्रंस्तुत संशोधनात महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयातील ग्रंथालया मार्फत दिल्या जाणाऱ्या सेवासुविधांवर भर दिला आहे, महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी म्हणजे उद्याचे भावी नागरीक आहेत. त्यांना घडविणारे ग्रंथालये सुसज्ज आहेत का? त्यांना ग्रंथालयीन सेवा सुविधा पुरविणारे ग्रंथपाल त्वरीत त्यांच्या गरजा पुर्ण करतात का? वाचकांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे त्यांच्या अभिरूचिंवर संस्कार करणे हे काम ग्रंथालये करू शकतात. नवसाक्षरांना वाचनाची सवय लागली नाही तर ते वाचनापासून दूर रहातील, यावर उपाय म्हणून सर्वांनी एकत्र येवून ग्रंथालयीन गुणवत्ता व दर्जा वाढविणे गरजेचे आहे. ग्रंथालयाच्या वाचकांनी ग्रंथालय साहित्याचा अधिकाधिक वापर करणे ही आजची गरज आहे. शिक्षणाची गुणवत्ता अधिकाधिक वाढवायची असेल तर ग्रंथालयाचा वापर वाढविणे व ग्रंथालय सेवा आणि साहित्य सहज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने दक्षता घेणे अधिक गरजेचे आहे.

सदर संशोधनाच्या मदतीने ग्रंथालयाची माहिति मिळेल. वाचकांच्या ग्रंथालयाकडुन प्रत्यक्ष काय अपेक्षा आहेत. त्यांना ग्रंथालयीन सेवा सुविधा मिळवितांना कोणकोणत्या अडचणी येतात हे शोधुन ग्रंथालयामार्फत देण्यात येणाऱ्या सेवासुविधा यांची संख्यात्मक व गुणात्मक बदल याविषयी माहिति मिळेल व त्याचा फायदा सर्वांना होईल.

संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Researsh)

संशोधनाचा पाया हा संशोधनाच्या उद्दिष्टांवर आधारित असतो. कारण संशोधन जाणीवपूर्वक, हेतूपुरस्कृत व नियोजनपुर्ण असावे लागते. संशोधन हे निवडलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने पूर्ण करावे लागते. उद्दिष्टे स्पष्ट असतील तर संशोधनास अचूक दिशा मिळते आणि त्या अनुषंगाने संशोधकास संशोधन करता येते.

उद्दिष्टांद्वारे संशोधन समस्या अधिक सुस्पष्ट करता येते. त्याकरीता उद्दिष्टे सुस्पष्ट असावी व त्यामध्ये कोणतीही संदिग्धता नसावी. उद्दिष्टदर्शकच्या एका वाक्यामध्ये संशोधन समस्येच्या दोन वा अधिक पैलूंचा समावेश करू नयेत. उद्दिष्ट पूर्तीसाठी कोणकोणत्या कृती करणे आवश्यक आहे याचा उल्लेख उद्दिष्टांमध्ये असावेत.

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने खालील उद्दिष्टे निर्धारित केलेली आहेत

१. महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयातील ग्रंथालयांचा सध्य:स्थितीचा अभ्यास करणे.
२. स्वायत्त महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवासुविधांची माहिती घेणे.
३. स्वायत्त महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवासुविधा देतांना अलेल्या अडचणींचा अभ्यास करणे.
४. स्वायत्त महाविद्यालयातील सेवासुविधाचा ग्रंथालयीन वाचकावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
५. सदर अभ्यासाच्या निष्कर्षावर आधारीत सुचना करणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research)

गुड आणि हॅट यांच्या मते, गृहितकृत्य ही अशी मान्यता आहे की, जी सत्य सिध्द करण्यासाठी तिचे प्रायोगात्मक परिक्षण केले जावू शकते आणि पुढील संशाधनासाठी ते उपयुक्त असते.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने खालील गृहितके मांडली आहेत.

१. महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महविद्यालयातील ग्रंथालयाचे कार्य समाधानकारक आहे.
२. ग्रंथालयीन सेवासुविधांमधील बदलांमुळे सेवासुविधा वृध्दिंगत होत आहेत.
३. दर्जेदार व प्रभावी सेवांमुळे वाचकांना ग्रंथालयीन सेवासुविधांचा लाभ मिळत आहे.
४. बदललेल्या ग्रंथालयीन सेवांमुळे वाचकांचा ग्रंथालयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे.

५.ग्रंथालयाच्या सर्वांगीन विकासाकडे लक्ष पुरविले जात आहे.

संशोधन पध्दती (Research Methodology)

कोणत्याही विषयाचा विकास हा त्या विषयाच्या संशोधनावर अवलंबून असतो. संशोधन म्हणजे सत्याचा किंवा अज्ञानाचा शोध व संशोधन पध्दती म्हणजे तर्कशुध्द विचार करण्याचे तंत्र असून त्या तंत्राच्या आधारे समस्या सिमित करणे होय.

संशोधनाची व्याख्या

डॉ. पी. एल. भांडारकर: नव्याने उजेडात आलेल्या तथ्यांच्या आधारे प्रस्थापित स्वीकृत निष्कर्ष व सिध्दांत पुन्हा तपासून पाहण्यासाठी केलेली सखोल चिकित्सक चौकशी किंवा प्रयोग म्हणजे संशोधन होय. जे. डब्ल्यु, बेस्ट: संशोधन ही अशी अधिक व्यवस्थित क्रियात्मकता आहे की जी नव्याचा शोध घेते व संघटित ज्ञानाला अधिक विकसित करते. सी. ए. मोझार: सामाजिक घटना व सामाजिक संमस्यांच्या बाबतीत संशोधन होय. संशोधनाचा विषय, माहितीचे स्वरूप व उद्दीष्टे यांवर संशोधन पध्दतीची निवड अवलंबून असते. संशोधन हे शास्त्रीय पध्दतीने होणे आवश्यक आहे. शास्त्रीय संशोधन पध्दती तीन आहेत.

१) वर्णनात्मक संशोधन पध्दती (Descriptive Research method)

२) ऐतिहासिक संशोधन पध्दती (Historical Research method)

३) प्रायोगिक संशोधन पध्दती (Expermental Research method)

एखाद्या स्थितीचा, व्यक्तीचा किंवा गटांच्या वैशिष्टयांच्या अचूक व वस्तुस्थिती निदर्शक वर्णन करणे हे वर्णनात्मक वैशिष्टयांचे अचूक व

निपक्ष:पाती वर्णन हे ज्यांचे उद्दिष्ट असते. त्यालाच वर्णात्मक संशोधन पध्दती म्हणतात.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा (Scope & Limitation of Research)

संशोधना विषयाचा विस्तार, सर्वसमावेशकता भौगोलिक व कालखंड यांचे आकारमान इ. घटक संशोधन विषयाची व्याप्ती ठरवत असतात. समस्येचे निरसन करण्यासाठी संशोधकाला त्या विषयाची व्याप्ती निश्चित करण्यात आली आहे. संशोधकाने आपल्या विषयाचे संशोधन करीत असताना आपल्या विषयाचे संशोधन वेळेत पूर्ण करावयास हवे त्यांचे पूर्वनियोजन करणे आवश्यक आहे. संशोधन विषयाचे भौगोलिक आकारमान व गोळा करावयाच्या माहितीचा कालखंड म्हणजे संबंधित विषयाची व्याप्ती होय. संशोधन जर सखोल व दर्जेदार बनवयाचे असले तर संशोधन विषयाची व्याप्ती मर्यादित असणे गरजेचे आहे

१. सदर संशोंधनासाठी महाराष्ट्र राज्यातील स्वायत्त महाविद्यालयीन ग्रंथालयाची निवड करण्यात आलेली आहे.
२. सदर संशोधनासाठी महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग अभ्यासासाठी निवडला आहे.
३. सदर संशोधनामध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व ९१स्वायत्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा अभ्यास केला जाणार आहे.

माहिती संकलन तंत्र व साधने (Data Collection Techniques & Tools)

वास्तविक पाहता संशोधनाची चौकट माहितीच्या आधारावरच उभी केली जाते. ज्ञानप्राप्ती करणे हे संशोधनाचे उद्दिष्ट असते. संशोधनात एखादा विषय निश्चित झाला की त्या अनुषंगाने माहिती संकलित करावी लागते अशी माहिती नेहमी वस्तुनिष्ठ व विश्वसनीय असावी

लागते. माहिती संकलित करणे ही एक शिस्तबध्द प्रक्रिया आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधक प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची व निरीक्षण तंत्राचा उपयोग करणार आहे. तर ग्रंथपालांकडून, अनुसूचीद्वारे तसेच प्रश्नावलीद्वारे माहिती संकलित करणार आहे. व ग्रंथालयांना प्रत्यक्ष भेट देवून निरीक्षण तंत्राद्वारे माहिती संकलित करणार आहे.

माहितीचे विश्लेषण व सादरीकरण (Information Analyasis & Presentation)

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने गोळा केलेली अचुक, वस्तुनिष्ठ माहिती निवडुन सत्यता शोधून तिचे योग्य प्रकारे वर्गीकरण व सांकेतीकीकरण करून त्या माहितीचे विश्लेषण केले जाणार आहे.

माहितीचे सादरीकरण (Presentation)

तक्ता, आकृत्या, नकाशे, आलेख, छायाचित्रे याचा वापर करण्याचे निश्चित केले आहे. कारण माहितीचे सादरीकरण करताना एखादा गुंतागुतींचा तपशील सांख्यिकीय आलेख व चित्राद्वारे स्पष्ट केल्यास वाचकांना आकलनास सुलभ होते.

प्रकरणाची रूपरेषा **(Tentative Chapter Scheme)**

प्रकरण पहिले : प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रकरण दुसरे : पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : संबधित विषयासंबधी माहितीचे संकलन

चौथे : संकलित माहितीचे विश्लेषण

प्रकरण पाचवे : निष्कर्ष व शिफारशी

संदर्भग्रंथ सूची.

१. कुंभार राजेंद्र,(२०१५),'ग्रथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पध्दती', युनिव्हर्सल प्रकाशन: पुणे.

२. कऱ्हाडे बी. एम., (२००७), 'शास्त्रीय संशोधन पध्दती', पिंपळापूरे ॲण्ड कं. प्रकाशन: नागपूर.

३. मुळे व उमाठे, (१९८७), 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ : नागपूर.

४. फडके द. ना. (२००८), 'ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण, फडके प्रकाशन: कोल्हापूर.

५. नरगुंदे रेवती, (२००२), 'ग्रंथालय आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन: पुणे.

६.पारखी गंगाधर रघुनाथ, (२००१), 'ग्रंथालय शास्त्र परिचय युनिव्हर्सल प्रकाशनः पुणे.

७.नरगुंदे रेवती, (१९९६), 'ग्रंथालय आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशनः पुणे.

८.पाटील वा. भा., (१९९८), 'संशोधन पध्दती, मंगेश प्रकाशन,: नागपूर.

९.काचोळे दा. धो.(२००५), ' समाजशास्त्रातील संशोधन पध्दती, कैलास प्रकाशनः औरंगाबाद.

१०. http://shodhganga.inflibnet.ac.in/

http://nlist.inflibnet.ac.in/

११- Kothari C. R. (20011) 'Research Methodology Methods & technique , Age International Publisher: Delhi, New.

संशोधक

कारंडे सोमनाथ मारूती

मार्गदर्शक

डॉ एन. आर. काटे

ग्रंथपाल,

श्रीमती सुशिलादेवी देशमुख महीला माहाविद्यालय,

लातुर.